शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना सहाय्यक अनुदान (अनिवार्य) वितरीत करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक - मराग्रं-२०१९/प्र.क्र.९३/२०१९/साशि-५,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०९ ऑगस्ट, २०१९

वाचा : १) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३,दि. ०१.०४.२०१९
२) ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.३२/२०१९-२०/५५८८-८९, दि. २०.०६.२०१९.
३) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. मराग्रं-२०१९/प्र.क्र.९३/२०१९/साशि-५ दि.२६.०६.२०१९
४) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३,दि. ०८.०७.२०१९.
५) ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.३२/२०१९-२०/७११९, दि. ३१.०७.२०१९.

प्रस्तावना :

राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या सहाय्यक अनुदानासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात मागणी क्र.डब्ल्यू-४, २२०५- कला व संस्कृती, १०५ सार्वजनिक ग्रंथालये, (०३)(०१) मध्यवर्ती, जिल्हा व तालुका ग्रंथालयांना सहाय्य (अनिवार्य) (२२०५ ०२९८) ३१- सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशिर्षातर्गत रु.१२५,००,००,०००/- (अक्षरी रुपये एकशे पंचवीस कोटी फ़क्त) इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि. ०८.०७.२०१९ रोजीच्या परिपत्रकानुसार अर्थसंकल्पीत निधीच्या ६० टक्के मर्यादेत निधी वितरणास मान्यता दिली आहे. त्यानुसार विचाराधीन लेखाशिर्षांतर्गत अर्थसंकल्पित निधीतून रु.७५,००,००,०००/- (अक्षरी रुपये पंच्याहत्तर कोटी फक्त) इतका निधी वितरणास मान्यता आहे. अंतरिम अर्थसंकल्पाद्वारे मंजूर निधीपैकी संदर्भ क्र. ३ येथील दि. २६.०६.२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार रु. ४१,६६,६६,०००/- (अक्षरी रुपये एकेचाळीस कोटी सहासष्ट लाख सहासष्ट हजार फ़क्त) इतका निधी वितरीत केला आहे. अर्थसंकल्पित निधीच्या ६० टक्केच्या मर्यादेत शिल्लक रु.३३,३३,३४,०००/- (रुपये तेहतीस कोटी तेहतीस लाख चौतीस हजार फक्त) इतका निधी वितरीत करुन खर्चास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या सहाय्यक अनुदानासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात मागणी डब्ल्यू-४, २२०५- कला व संस्कृती, १०५ सार्वजनिक ग्रंथालये, (०३)(०१) मध्यवर्ती, जिल्हा व तालुका ग्रंथालयांना सहाय्य (अनिवार्य) (२२०५ ०२९८) ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशिर्षातर्गत मंजूर निधीच्या ६० टक्केच्या मर्यादेत शिल्लक रु.३३,३३,३४,०००/- (अक्षरी रुपये

तेहतीस कोटी तेहतीस लाख चौतीस हजार फक्त) इतका निधी वितरित करण्यास येत आहे. सदर निधी संबंधित जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयास वितरीत व खर्च करण्यास ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना शासन मान्यता देण्यात येत आहे. तसेच जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्या कार्यालय प्रमुखांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे व त्यांना ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या उद्दीष्टाखालील देयकावर नियंत्रक अधिकारी म्हणून प्रतिस्वाक्षरी करण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

२. सदरचा खर्च मागणी डब्ल्यू-४, २२०५- कला व संस्कृती, १०५ सार्वजनिक ग्रंथालये, (०३)(०१) मध्यवर्ती, जिल्हा व तालुका ग्रंथालयांना सहाय्य (अनिवार्य) (२२०५ ०२९८) ३१- सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशिर्षातर्गत सन २०१९-२० मध्ये अर्थसंकल्पीत तरतूदीपैकी वितरीत केलेल्या निधीतून भागविण्यात यावा.

३. सदर निधी खर्च करण्याच्या अनुषंगाने शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशाचे पालन करण्यात यावे तसेच अनुदानाच्या रक्कमेची उपयोगिता प्रमाणपत्रे संबंधित कार्यालय प्रमुखांनी विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील.

४. सदरचा शासन निर्णय शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/ अर्थ-३, दि.०८.०७.२०१९ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे. सदर परिपत्रकामध्ये नमुद अटी व शर्तीची पूर्तता केलेली आहे.

५. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०८०९१५३९४०३००८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Anil Vithalrao Saware

Digitally signed by Anil Vithalrao Saware
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=073348b7a8767f0f7865422df1e65ce2f3bcdf6786e4712e2c088a9ac4ffee3f, cn=Anil Vithalrao Saware
Date: 2019.08.20 15:05:42 +05'30'

(अनिल वि. सावरे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखापाल-१ (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
२. महालेखापाल -२ (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
५. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
७. सर्व जिल्हा ग्रंथालय अधिकारी.
८. सचिव (उ.व.तं.शि.) यांचे स्वीय सहाय्यक
९. कक्ष अधिकारी (साशि १), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. निवडनस्ती (साशि-५), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.